भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५२८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०७/२०१७

**१) कारली बिट मध्ये गस्त करीत असतांना अनोळखी इसमाचा हाडाचा सांगाडा मिळुन आल्याने मर्ग नोंद . :–**

१ महिण्यापासुन ते आज पावेतो यातील फिर्यादी लक्ष्मण माणीक जवगडे वय २६ वर्ष, रा. गोबरवाही हा त्याचे अधिनस्त असलेले वन मजुर शिवदास कारु खंडाते वय ४५ वर्ष, रा. चिचोली २) प्रेमलाल धुर्वे वय ५० वर्ष, रा. आसलपाणी चे सह कारली बिट मध्ये गस्त करीत असता रोपवन क्षेत्र लागवड सन २०१३ मधील नर्सरी मध्ये अनोळखी (मृतकचे शरीराचा सांगाडा) आढळुन आल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. म्हैसकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**२) गळफास लावुन मुलीचा मृत्यु . :–**

दिनांक २३/०७/२०१७ चे १४.०० वा. दर. यातील फिर्यादी सुरेश मारोती दलाल वय ४८ वर्ष, रा. सिताराम सिटी भंडारा याची मृतक मुलगी कु. अबोली सुरेश दलाल वय १७ वर्ष, रा. सिताराम सिटी भंडारा व लहान मुलगी कु. सेजल यांच्यात भांडण झाले त्यावरुन मृतकने स्वत:चे बेडरुम मध्ये जावुन स्वत:ची ओढणी ही सिलींग फॅनला बांधुन गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. म्हैसकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**३) गर्भवती महिलेचा औषधोपचारा दरम्यान मृत्यु . :–**

दिनांक २२/०७/२०१७ चे ०९.४५ वा. दर. यातील मृतक सौ. उषा परमानंद वलके वय २६ वर्ष, रा. खुर्शीपार ही ९ महिण्याची गरोदर असुन तिच्या पोटात अचानक दुखत असल्याने तिला खुर्शीपार येथुन ॲम्बुलन्सने बेशुध्द अवस्थेत सामान्य रुग्णालय भंडारा येथे उपचार कामी भरती केले असता औषधोपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौचे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बैस यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. डोंगरे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**४) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २३/०७/२०१७ चे १२.०० वा. दरम्यान यातील मोटार सायकल क्र. एमएच ४०/६००७ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन रोडचे मधोमध उभे करुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. भंडारा येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उभाळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत

५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २३/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१ तीन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०२ केसेस करण्यात आलेल्या आहेत

(ऐ.टी. सुनगार)
स.पो.निरीक्षक
नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९८२३१२३३३६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.